

भारतीय स्त्री-शिक्षणाचे प्रणेते

# महात्मा फुले व सावित्रीबाई फुले

मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

संपादक

प्रा. डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे

PRINCIPAL
Shri... College, HINGOLI

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य | संध्या अनिल रोडगे | ११३ |
| १५. | 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथातील महात्मा जोतीराव फुले यांचे विचार | श्रीमाला कालिदास गुडदे | ११८ |
| [redacted] | | | |
| १७. | भारतीय स्त्रीजीवनात क्रांती घडवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले | श्रीम. पूनम प्रकाशराव माने | १२८ |
| १८. | महात्मा फुले यांच्या शेतकरी प्रश्नाविषयीच्या विचारांची प्रासंगिकता | प्रा. डॉ. मालती अशोक सानप | १३५ |
| १९. | महात्मा फुले व सत्यशोधक समाज | डॉ. श्रेया संजीव दाणी | १४२ |
| २०. | "महात्मा ज्योतीराव फुले यांचे अस्पृश्यउद्धारक कार्य : एक अभ्यास" | डॉ. एन. जी. भद्रे | १४८ |
| २१. | आदर्श दांपत्य महात्मा फुले व सावित्रीबाई फुले | वर्षा वसंतराव लगडे (माळी) | १५४ |
| २२. | महात्मा ज्योतिबा फुले स्त्री चळवळीचे प्रणेते | प्रा. डॉ. ए. व्ही. शिंदे | १६४ |
| २३. | महात्मा फुले : जीवन व कार्य | प्रा. मच्छिंद्र नाथा बेलोटे | १६८ |
| २४. | महात्मा ज्योतिराव फुले यांचे विचार | डॉ. नवीन केशवराव सोळंके | १७ |
| २५. | महात्मा ज्योतिराव फुले यांचे शेतकरी विषयक चिंतन | प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र | १७ |
| २६. | महात्मा ज्योतीबा फुले व सावित्री फुले यांचे स्त्री शिक्षण, सामाजिक कार्यात जडण–घडणीतील योगदान | विद्या दगडू वाघमारे | १८ |
| २७. | ''महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य'' | श्री. सुरेश नामदेव दांडगे | १९ |
| २८. | सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य | डॉ. घन आनंद | २० |

# महात्मा ज्योतिराव फुले यांचे शैक्षणिक विचार

**डॉ. बी. एस. क्षीरसागर**
इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना**

भारतीय शैक्षणिक क्रांतीचे जनक या दृष्टीने महात्मा जोतिराव फुले यांच्याकडे पाहिले जाते. भारतीय समाजसुधारकांमध्ये त्यांचे स्थान वरचे आहे. भारतामध्ये एकोणिसाव्या शतकात अनेक सुधारक होऊन गेले. मात्र महात्मा फुलेंची कार्यपध्दतीच वेगळी होती. फुले दांपत्याचे जीवन म्हणजे धगधगणारे अग्निकुंड. जोतिराव फुलेंनी चुलबोळक्याचा संसार आपल्या आयुष्यात कधिच मांडला नाही. त्यांनी समाजाचा, आप्तांचा रोष पत्करला. निर्भिडपणे आल्या प्रसंगाला तोंड दिले. खरे म्हणजे म. फुलेंना पहिले राजकीय परिवर्तन व्हावे असे वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्नही केले. परंतु ब्रिटीश राजवटीच्या विरोधात उमाजी नाईक, भाऊ खरे, चिमणाजी जाधव, बापू मांगरे यांनी केलेले उठाव ब्रिटीशांनी मोडून काढल्याची कल्पना फुलेंना होती. हे काम एकटयाचे नाही हे त्यांनी ओळखलेहोते. त्यामुळे ब्रिटीश राजवट उलथून टाकण्याऐवजी त्यांनी आपले लक्ष समाजक्रांतीकडे केंद्रित केले. समाजातील जातीयता, अस्पृश्यता, विषमता, अज्ञान, अशिक्षितपणा व आर्थिक दुरावस्थेचे चित्र पाहिल्यानंतर राजकीय क्रांती करण्याअगोदर सामाजिक क्रांती करण्याचे निश्चित केले. सामाजिक क्रांतीची सुरूवात त्यांनी शैक्षणिक चळवळीपासून केली. तत्कालीन परिस्थितीमध्ये शिक्षणावर अनेक बंधने होती. अस्पृश्य व स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. फुलेंनी या सर्व वंचित समुहासाठी शिक्षणाची दारं उघडी केली. समाजातील चालीरीती, रूढी–परंपरा संपुष्टात आणण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला. या सत्यशोधकसमाजामार्फत लोकांमधील अज्ञान दुर करून प्रतिगामी विचारांच्या लोकांशी लढा दिला. फुलेंनी उपेक्षित समुहास शिक्षण मिळावे यासाठी अविरत चळवळ सुरू ठेवली. हि चळवळ चालवित असतांना अनेक धर्ममार्तंडव सनातनी लोकांनी फुले दांपत्यांना निंदा–नालस्ती, टिंगल–टवाळी व अपमानास्पद वागणूक दिली. म. फुले मात्र आपल्या कार्यापासून अजिबात ढळले नाही. धिरोदात्तपणे कार्य करीत राहिले. सर्वांना शिक्षित करण्याचे जे व्रत त्यांनी स्विकारले. त्यामध्ये ते यशस्वी झाले. उभे आयुष्य शिक्षण देण्यामध्ये घालविले. म्हणूनच त्यांना शैक्षणिक चळवळीचे अग्रणी, समाजक्रांतीचे जनक, असे संबोधिले जाते. खरे म्हणजे आज मुलभूत हक्क आणि अधिकारासाठी लढे व आंदोलने होत असतांना दिसतात. या



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

लढयाची प्रेरणा व शक्ती म्हणजे क्रांतीसुर्य म. फुलेंनी केलेली शैक्षणिक चळवळ होय.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

1) महात्मा फुलेंच्या शैक्षणिक विचारांवर प्रकाश टाकणे.
2) महात्मा फुलेंच्या शैक्षणिक कार्याचा थोडक्यात आढावा घेणे.
3) महात्मा फुलेंच्या शैक्षणिक विचारांचे महत्व स्पष्ट करणे.

**संशोधनाची गृहितके**

1) महात्मा फुलेंनी आपल्या शैक्षणिक विचाराद्वारे समाज जागृती केली.
2) शिक्षण म्हणजे तीसरे नेत्र.
3) मनुष्यत्वासाठी शिक्षण, शिक्षणाशिवाय मनुष्यत्व येत नाही.

**महात्मा फुलेंचे शैक्षणिक विचार**

महात्मा फुले यांचे संपूर्ण कार्य ब्रिटीश राजवटीशी निगडीत आहे. या काळातील शिक्षण पध्दतीत ब्राम्हणांची मक्तेदारी होती. इतरांना शिक्षण घेण्यास मज्जाव होता. ही बाब चुकीची आहे. याची जाणीव ब्रिटीशांना असूनही याबाबत ते निरूत्साही होते. कारण त्यांचे फक्त एकच ध्येय होते ते म्हणजे भारतात आपली सत्ता स्थिर आणि मजबुत करणे. त्यामुळे ब्रिटीशांनी भारताच्या सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये हस्तक्षेप करण्याचे टाळले. ब्रिटीश सरकारने शिक्षणाच्या बाबतीत झिरपण्याचा सिध्दांत मांडला. या सिध्दांतानूसार समाजातील वरिष्ठ वर्गांना प्रथम शिक्षण दिले जाणार होते. आणि नंतर वरिष्ठ वर्गाकडून कनिष्ठ वर्गापर्यंत शिक्षण प्रवाहित केले जाणार होते. परंतू कनिष्ठ वर्गाला शिक्षण देण्याबाबत सरकार व वरिष्ठ वर्ग उदासिन होते. म्हणून महात्मा फुले यांनी या झिरपण्याच्या सिध्दांतास विरोध केला. मानसाच्या अधोगतीचे केवळ अशिक्षितपणा हेच प्रमुख कारण आहे. हे सत्य तत्कालीन समाजासमोर मांडून शिक्षण हे मानवी उन्नतीचे एकमेव साधन आहे. हा विचार म. फुले यांनी मांडला. इंग्रजाच्या झिरपण्याचा सिध्दांत स्वप्नाळू वृत्तीचा सिध्दांत म्हणून त्यांची संभावना केली. आणि प्रत्यक्ष शिक्षण देण्याची पध्दत अंमलात आणण्याची मागणी केली. 'झिरपणीच्या सिध्दांतामुळे समाजातील सामाजिक अभिसरणाची क्रियाच खंडित झाली होती. भारतात शिक्षण हे पंतोजी मार्फत दिल्या जाई.

भारतामध्ये पंतोजी, पंडित, मुल्ला मौलवी व कमी शिकलेल्या व्यक्तिंमार्फत इमारती नसलेल्या बऱ्याच शाळा चालविल्या जात होत्या. या शाळेमध्ये कुठलीच समानता नव्हती. शैक्षणिक दर्जा खालावलेला होता. पंतोजीच्या शाळेत श्रेणीनूसार शिक्षण दिल्या जाई. या शाळेत दलित आणि मागासलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश नव्हता. पंतोजींच्या शाळेबाबत उदिग्न होऊन म. फुले म्हणतात. "अज्ञानी बांधवांच्या

शिक्षणासाठी त्यांनी स्वतःच्या घरी वा अन्यत्र शिक्षण वर्ग सुरू केले आहेत का? की त्यांनी स्वतःला मिळालेले ज्ञान, अडाणी गावंढळांच्या संसर्गाने मलिन होऊ नये. म्हणून त्याला स्वतःची देणगी समजून आपल्याजवळ राखून ठेवले आहे."[२] एकूण फुलेंच्या या विचारावरून स्पष्ट होते की, समाजातील मनूवादीवृत्ती बदलली नव्हती. तत्वता मागासवर्गांना शिक्षण मिळणे शक्य नव्हते. कारण बहूतांश पंतोजी हे सेवेशी एकनिष्ठ नव्हते. पंतोजी हा कळवळ्याचा असून तो भाडोत्री सवार्थसाधू व आपमतलबी कल्पित धर्माभिमानी नसावा.[३] तरच वंचितांना निरपेक्ष शिक्षण मिळू शकेल. यासाठीच फुलेंनी हंटर आयोगास लेखी सुचविले कि, एक तर ह्या शाळा प्रमाणित करून सरकारी नियंत्रण क्षेत्रात आणाव्या किंवा ताबडतोब बंद करून सर्वांना समान न्याय देणाऱ्या एकसूत्री शाळा काढाव्या, सगळीकडे सारखेच शिक्षण असले पाहिजे. फुले म्हणतात "पंतोजीच्या शाळा म्हणजे जातीयतेची तुंबलेली डबकी होय."[४]

समाज परिवर्तनासाठी शिक्षण हे सर्वात मोठे माध्यम असते हि फुलेंची विचारधारा होती. शिक्षणाचे महत्व विशद करतांना फुले म्हणतात. विद्येविना मती गेली, मतिविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतिविना वित गेले, वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.[५] शुद्रातीशुद्र व स्त्रीया शिक्षणापासून वंचित राहिल्यानेच त्यांची अधोगती झाली आहे. यामुळेच फुलेंनी सर्वांसाठी शिक्षण देण्याचे वत्त घेतले होते. फुलेंनी शिक्षणाला तिसरे नेत्र म्हटले आहे. शिक्षणाच्या अभावामुळे मनुष्य बौध्दिक व नैतिकदृष्ट्या पंगू होतो. त्यात व्यवहार कळत नाही. त्यामुळे त्याची पिछेहाट होते. तर शिक्षणामुळे माणूस साक्षर, सज्ञान बनतो. स्वतंत्र्यपणे विचार करू शकतो. ध्येयवासी व चिकित्सकवृत्तीचा बनतो. इतरांचा गुलाम न होता. स्वत्वः निर्माण करू शकतो. स्त्रिया आणि शुद्रातिशुद्रांना शिक्षण न मिळाल्यानेच ते उच्च वर्णीयांच्या सामाजिक व आर्थिक गुलामगिरीत अडकले. "भटशाहीने शेतकऱ्यांना सतत अडाणीत ठेवले. त्यांना ज्ञानाचा प्रकाश पाहू दिला नाही. अंधश्रध्दांच्या जोखडात त्यांना बांधले."[६] त्यामुळे सर्व भारतीयांसाठी शिक्षण सक्तिचे केले जावे असा विचार फुलेंनी मांडला. महात्मा फुलेंच्या शैक्षणिक विचारांचा मोठा प्रभाव सावित्रीबाई फुले यांच्यावर पडला होता. सावित्रिबाईंचे सर्व कार्यच जोतिराव फुले यांच्या प्रभाव छायेतून आकारात येते. शिक्षणाचे महत्व विशद करतांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आपल्या कवितेद्वारे शिक्षणाचे मूल्य सांगतात कि, "शुद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा शिक्षणाने मनुष्याच पशुत्व घटते पाहा"[७] माणसाला मानूस म्हणून जगावयाला सांगणे हे त्यांचे ध्येय होते. महात्मा फुलेंनी शाळा

काढल्या, परंतू किती व कुठे काढल्या हा मुळ गाभा नाही तर शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. केवळ साक्षर करण्यासाठी त्यांना शिक्षण द्यावयाचे नव्हते,तर शिक्षणातून त्यांना समाज जागृती करावयाची होती. सामान्य लोक पशूतूल्य जीवन जगत होते. त्यांच्यात मनुष्यत्व यावे यासाठीच त्यांचा प्रपंच होता.

ईस्ट इंडिया कंपनीने भारतात इ.स. १९९३ पर्यंत शिक्षण प्रचारासाठी काहीही केले नाही. इ.स. १९९३ नंतर शिक्षणासाठी अतिशय अल्प तरतूद केली. भारतीयांच्या शिक्षणाकडे ब्रिटीशांनी दुर्लक्ष केले. इ.स. १८८१–८२ चे मुंबई प्रांतातील चित्र विदारक होते. होते. इ.स. १८५४ मध्ये सामान्य जनता जेवढी शिक्षणापासून दुर होती, तीच स्थिती इ.स. १८८१–८२ पर्यंत कायम होती. मुंबई प्रांतात उच्च माध्यमिक शाळेत व महाविद्यालयात दलित व आदिवासी समाजाचा एकही विद्यार्थी नव्हता. [8]वंचित गटांना शैक्षणिक प्रवाहाच्या दूर ठेवण्यात येत असे. लॉर्ड रिपनच्या कारकिर्दीत सर विल्यम हंटरच्या अध्यक्षतेखाली एक शिक्षण आयोग नेमला होता. यामध्ये मागासलेल्या आणि आदिवासी जाती–जमातींना प्राधान्य देण्याच्या शिफारशी करण्यात आल्या होत्या. म. फुलेंनी हंटर आयोगाला सादर केलेल्या निवेदनात किमान बारा वर्षे वयापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे. कारण ९० टक्के खेडे गावात शिक्षणाच्या सोई उपलब्ध नव्हत्या. शेतकऱ्यांच्या शिक्षणाबाबत तर भिषण दुरावस्था होती. जनता दरिद्री होती, परावलंबी होती. पंतोजींनी खेडेगावात चालविलेल्या शाळांचाही उपयोग नव्हता. कष्टकऱ्यांच्या मुलांना कसदार शिक्षण मिळावे असा फुलेंचा आग्रह होता. यासाठी त्यांनी १९ ऑक्टोबर १८८२ रोजी हंटर शिक्षण आयोगाला शिक्षणाच्या बाबतीत सविस्तर निवेदर दिले. त्या निवेदनात फुलेंनी सरकारला सुचना दिल्या.

१) १२ वर्षे असलेल्या सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे.
२) प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी.
३) प्राथमिक शाळेतील शिक्षक प्रशिक्षित असावेत.
४) आदिवासी जाती–जमातींना शिक्षणात प्राधान्य देण्यात यावे.
५) लाकेल सेस फंडापैकी अर्ध्यापेक्षा अधिक भाग प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा.
६) शाळांच्या कारभारावर शिक्षण विभागाचे नियंत्रण असावे.
७) प्राथमिक शाळांवर होणाऱ्या खर्चाची जबाबदारी नगरपालिकांनी घ्यावी.
८) प्राथमिक शाळांना प्रांतिय सरकारने भरपूर अनूदान द्यावे.



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

हंटर आयोगाने मात्र फुलेंनी केलेल्या सुचना जशाच–तशा स्विकारल्या नसल्याने हंटर आयोगाच्या शिफारशींवर फुले समाधानी नव्हते. त्यामुळे त्यांनी आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म ' या पुस्तकात हंटरवर टिका करतांना म्हटले. "हिंदूस्थानातील आर्य ब्राम्हणखेरीज शुद्रातिशुद्र, भिल्ल, कोळी वगैरे लोकांविषयी बिलकुल ज्ञान नाही. म्हणून ते तसे वाचाळपणा करीत आहे."[९] खरे म्हणजे प्राथमिक शिक्षणावरच पूढील शिक्षणाचा डोलारा उभा असतो. प्राथमिक शिक्षणाचा उद्दिष्ठात लेखन, वाचन व गणित –थ्री आर (Writing, Reading, Arithmetic) चे प्राथमिक स्वरूपाचे ज्ञान देणे ऐवढेच अंतर्भूत नसून, मुलामुलींच्या शारीरिक, बौध्दिक व मानसिक विकासाला पोषक अशा सर्व पैलूंच्या प्राथमिक स्तरावर जाणिव निर्माण करून त्यांचे संवर्धन होणे आवश्यक मानले जाते. काही ठराविक वयोमर्यादेपर्यंत म्हणजे निदान वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असा फुलेंचा आग्रह होता.[१०] हंटर साहेबांनी फुलेंच्या सुचना सर्व न मानल्याने फुले हंटर यांच्यावर टिका करतात.

हंटर आयोगानूसार प्राथमिक शिक्षणाचा भार स्थानिक संस्थांवर सोपविणे हा लोकशाही प्रणालीचा महत्वपूर्ण कार्यक्रम आहे. मात्र भारतीय समाजातील स्थिती मात्र वेगळी होती. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हाती प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सोपविणे जोखमिचे होते. कारण या संस्थानी शैक्षणिक उदासिनता, जातीव्यवस्था व अंध्रश्रध्देला बळी ठरलेला वर्ग स्वतः शासनाचे लाभ समाजात देण्यास निरूपयोगी ठरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांना आती अहंकाराची डबकी म्हणत.[11]यामुळे फुले प्राथमिक शिक्षणावर शासनाचे नियंत्रण असावे असे ठाम मत होते.

**सारांश**

महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार त्या काळात उच्चवर्णीय लोकांना रूचत नव्हते. परंतू आज मुलभूत हक्क आणि अधिकारासाठी ज्या चळवळी चालू आहेत त्या चळवळीची पायाभरणी महात्मा फुले यांनीच केली आहे. कारण फुले यांच्या काळात ब्राम्हणेत्तर समाजाला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. त्या काळात शिक्षण हे सार्वजनिक नव्हते. शिक्षण ही ब्राम्हणांची मक्तेदारी होती. बहुजन समाज अज्ञानाच्या गर्तेत सापडला होता. त्यांच्या डोळयात फुलेंनी झणझणीत अंजन घातले. प्रसंगी आसूडही ओढले. व शिक्षणाचे महत्व वारंवार कथन केले. माणसाच्या अद्योगतीला केवळ शिक्षण हे कारण असल्याचे विदारक सत्य फुले आपल्या शैक्षणिक विचारातून प्रकट करतात. महात्मा फुलेंचे शैक्षणिक विचार अदभूत व परिस्थितीसापेक्ष आहेत. वंचितांना शिक्षण



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

मिळावे यासाठी ते अहोरात्र राबराब राबतात. उद्देश एकच शिक्षणापासून वंचित वर्गाला शिक्षित करून त्यांचा सर्वांगीण विकास होणे, माणसामध्ये 'मनुष्यत्व' निर्माण व्हावे. यासाठी त्यांनी परिस्थितीनूसार मुला–मुलींसाठी, प्रौढांसाठी, शुद्रातिशुद्रांसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. एकोणिसाव्या शतकातीन तो एक चमत्कार होता. खरे म्हणजे महात्मा फुलेंच्या शैक्षणिक विचाराने व कार्याने सर्व समाज दिङःमुखझाला. विपरित परिस्थितीमध्ये फुलेंनी जे शैक्षणिक विचार मांडले. व ते विचार अंमलात आणण्यासाठी ते अहोरात्र कार्यरत राहिले, हि घटना भारताच्या इतिहासामध्ये एक रोमांचकारी आहे. खरे म्हणजे समाजामध्ये समता निर्माण व्हावी व शिक्षणाचा मुलभूत अधिकार सर्वांना मिळावा या लढयाची पायाभरणी महात्मा फुलेंची आहे. यामुळेच कर्ते सुधारक, आद्य शिक्षण सुधारक, म्हणून महात्मा फुले यांचे नाव आदराने घेतले जाते. महात्मा फुलेंनी शिक्षणास तिसरे नेत्र म्हटले आहे. समाजाने मात्र महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याचा विपर्यास आणि उपेक्षा केली ऐवढेच दुर्दैव वाटते.

**संदर्भ सूची**


१. कीर धनंजय., (संपा), (१९८२), महात्मा फुले समग्र वाङमय,मुंबइ, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंत्रालय,१८४.
२. कीर धनंजय., (संपा), (१९८२), महात्मा फुले समग्र वाङमय, मुंबइ, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंत्रालय,८.
३. फुले, महात्मा जोतीराव., (२०१८), सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, नागपूर, समता प्रकाशन, आवृत्ती पंधरावी, ७८.
४. हाडेकर, डी. वाय., (२००५), डॉ. बाबासाहेबांचे शैक्षणिक विज्ञान, पुणे, सुगावा प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २०७.
५. Hans,Reichenback., Rise of Scientific Philosophy, (1973), (अनु)ग. वि. कुंभोजकर, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, प्रथम आवृत्ती,३७
६. कांबळे, उत्तम., (२०१०), महात्मा फुल्यांची जलनीती, पुणे, सुगावा प्रकाशन, आवृत्ती द्वितीय,१४.
७. माळी, मा. गो., (२००३), सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,१०
८. Ambedkar,B.R.,(1982)Writing and Speeches Vol.2 Bombay,417
९. कठारे, अनिल., (२०११), फुले–शाहू–आंबेडकर, कंधार, पूनम प्रकाशन, २९
१०. कीर, धनंजय., मालशे., (१९८८), महात्मा फुले, समग्र वाङमय, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, (परिशिष्ठ–२), ५२२.
११. हाडेकर, डी. वाय., (२००५) डॉ. बाबासाहेबांचे शैक्षणिक विज्ञान, पुणे, सुगावा प्रकाशन, २०८.
१२. कीर धनंजय., (संपा), (१९८२), महात्मा फुले समग्र वाङमय, मुंबइ, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंत्रालय,(परिशिष्ठ),१०.
१३. कठारे, अनिल., (२०११), फुले–शाहू–आंबेडकर, कंधार, पूनम प्रकाशन, ३२
१४. वडसकर, महात्मा फुले गौरव ग्रथ, उनि,२२७
१५. कीर धनंजय., (संपा), (१९६९), महात्मा फुले समग्र वाङमय,मुंबइ, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंत्रालय, ३०३.




PRINCIPAL
Shivaji College, HINGOL

भारतीय सुधारणावादी चळवळीमध्ये महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य अत्यंत महत्त्वापुर्ण आहे. त्यामध्ये विशेषतः स्त्री उध्दारासाठी, स्त्री शिक्षणासाठी त्यांनी १९ व्या शतकात मांडलेले विचार, प्रत्यक्ष केलेले कार्य हे क्रांतीकारक स्वरुपाचे होते. फुले दांपत्यांनी स्त्रि शिक्षणासाठी सुरु केलेले कार्य तत्कालीन काळाचा विचार केला तर त्यांचे हे कार्य म्हणजे एक मोठी सामाजिक व शैक्षणिक क्रांतीच म्हणावी लागेल. त्यांचे हे कार्य म्हणजे त्याकाळातील सनातनी मंडळींना हा एक मोठा चपराक होता.या मार्गावर मार्गक्रमण करत असताना त्यांना सनातनी मंडळींनी मोठा विरोध केला. अनेक अडथळे आणले, पण फुले दांपत्यांनी न घाबरता मोठ्या धाडसाने आपले कार्य पुढे चालुच ठेवले.

आज २१ व्या शतकात स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात जी उत्तुंग भरारी घेतली आहे. याचे खऱ्या अर्थाने श्रेय फुले दांपत्यांना द्यावे लागेल.

**प्रा.डॉ.सदाशिव दंदे**
अध्यक्ष,
ईतिहास अभ्यास मंडळ, स्वा.रा.ति.म.विद्यापीठ, नांदेड

SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)
Nanded, Maharashtra (India)
website : www.wiidrj.com

9 788195 547951

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

भारतीय सुधारणावादी चळवळीमध्ये
त्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य
यंत महत्त्वपुर्ण आहे. त्यामध्ये विशेषत: स्त्री
ारासाठी, स्त्री शिक्षणासाठी त्यांनी १९ व्या
कात मांडलेले विचार, प्रत्यक्ष केलेले कार्य
क्रांतीकारक स्वरुपाचे होते. फुले दांपत्यांनी
शिक्षणासाठी सुरु केलेले कार्य तत्कालीन
ळाचा विचार केला तर त्यांचे हे कार्य म्हणजे
मोठी सामाजिक व शैक्षणिक क्रांतीच
ावी लागेल. त्यांचे हे कार्य म्हणजे
काळातील सनातनी मंडळींना हा एक मोठा
राक होता.या मार्गावर मार्गक्रमण करत
ताना त्यांना सनातनी मंडळींनी मोठा विरोध
ा. अनेक अडथळे आणले, पण फुले
त्यांनी न घाबरता मोठ्या धाडसाने आपले
र्य पुढे चालूच ठेवले.

आज २१ व्या शतकात स्त्रियांनी प्रत्येक
ात जी उत्तुंग भरारी घेतली आहे. याचे खऱ्या
ाने श्रेय फुले दांपत्यांना द्यावे लागेल.

**प्रा.डॉ.सदाशिव दंदे**
अध्यक्ष,
हास अभ्यास मंडळ, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)
Nanded, Maharashtra (India)
website : www.wiidrj.com

9 788195 547951